# वसुंधरेचा जाहीरनामा

**भूमिका**

पृथ्वीच्या प्रदीर्घ इतिहासातल्या एका अत्यंत नाजूक टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. या टप्प्यावर मानवजातीचे भवितव्य कसे असावे, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. संपूर्ण जग अधिकाधिक परस्परावलंबी आणि कमकुवत बनत असताना आपल्यापुढे एकीकडे प्रचंड आश्वासकता तर दुसरीकडे तितकाच मोठा धोका वाढून ठेवला आहे. कमालीच्या वैविध्याने नटलेल्या सांस्कृतिक प्रवाहांमध्ये आणि सजीव सृष्टीत आपण नांदत असलो तरी समान भवितव्याने बांधल्या गेलेल्या एकाच मानवी कुटुंबाचे आपण सारे अविभाज्य घटक आहोत, ही जाणीव ठेवण्यानेच आपल्याला खरी प्रगती साधता येईल. निसर्गाप्रती आदर, व्यापक मानवाधिकार, आर्थिक न्याय आणि शांततेची बूज राखणारी संस्कृती या चतुःसूत्रीवर आधारित शाश्वत वैश्विक समाजाची निर्मिती करण्यासाठी आपण एकत्र यायला पाहिजे. अशा समाजाच्या निर्मितीसाठी एकमेकांप्रती, सर्व सजिवांप्रती आणि येणाऱ्या पिढ्यांच्या प्रती जगभरच्या तमाम जनसमूहांनी कटिबद्ध होणे अपरिहार्य आहे.

**पृथ्वी, आपलं घर**

मानवजात हा सतत उत्क्रांत होत असलेल्या विश्वाचाच एक भाग आहे. सजिवांच्या अस्तित्वामुळे आपल्या या वास्तव्यस्थानात, म्हणजेच पृथ्वीवर, चैतन्य आहे. अनेकविध नैसर्गिक घडामोडींमुळे सजीवांचे निव्वळ अस्तित्वसुद्धा अनिश्चिततेने भारलेले आणि आव्हानात्मक बनत असले तरी, जीवसृष्टीच्या उत्क्रांतीसाठी आवश्यक ते वातावरणही या भूतलावर आहे. संपूर्ण वातावरण सुदृढ असण्या-नसण्यावर जीवसृष्टी विजिगिषू राहणार की नाही आणि मानवजात खुशाल असणार की नाही, हे अवलंबून आहे. संपन्न वनस्पती व प्राणीसृष्टी, सुपीक जमीन, शुद्ध जलस्रोत आणि स्वच्छ हवा हे सारेच या वातावरणाचे घटक आहेत. नैसर्गिक साधनसंपत्ती मर्यादित असल्याने वैश्विक वातावरण हा सर्व जनसमूहांच्या चिंतेचा विषय झाला आहे, म्हणून पृथ्वीवरील जीवनखुणांचे, वैविध्याचे आणि सौंदर्याचे रक्षण करणे हे सर्वांचेच पवित्र कर्तव्य आहे.

**जागतिक स्थिती**

उत्पादन आणि उपभोगाच्या प्रचलित पद्धतींमुळे पर्यावरणाची बेसुमार हानी होत आहे. परिणामतः संसाधनांची घट होत आहे आणि अनेक सजीव जातीही नाहीशा होत आहेत. याचा फटका काही समुदायांना बसत आहे. विकासाच्या लाभांचं समन्यायी वाटप होत नसल्यामुळे श्रीमंत आणि गरीब यांच्यातली दरी वाढत आहे. अन्याय, गरिबी, अज्ञान आणि हिंसाचाराच्या मोठ्या फैलावामुळे जनसामान्यांच्या हालअपेष्टांमध्ये भर पडत आहे. लोकसंख्येच्या अभूतपूर्व वाढीमुळे पर्यावरणीय आणि सामाजिक यंत्रणांवर मोठा ताण आला आहे. वैश्विक सुरक्षिततेचा पाया हादरला आहे. हा प्रवास घातक आहे, पण अटळ नाही.

**आगामी काळातील आव्हाने**

परस्पर सहकार्यातून पृथ्वीचे आणि एकमेकांचे हित जपायचे की स्वतःच्या आणि एकूणच सजीव सृष्टीच्या विनाशाचा धोका पत्करायचा, यातला एक पर्याय निवडणं हे सर्वस्वी आपल्या हातात आहे. आपली नीतिमूल्ये, विविध संरचना आणि जीवनपद्धती यांत मूलभूत बदलाची गरज आहे. मूलभूत गरजा भागल्यानंतर हव्यास पूर्ण करण्याच्या मागे न धावता जीवन समृद्ध करण्यामध्येच विकासाचे सार सामावलेले आहे, हे आपण पक्के समजून घेतलं पाहिजे. संपूर्ण मानवी समुदायाच्या गरजांची पूर्तता

करताना पर्यावरणाची कमीत कमी हानी व्हावी यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि तंत्रज्ञान आपल्यापाशी आहे. जागतिक नागरी समाजाच्या सध्या होत असलेल्या उदयामुळे लोकशाहीवादी आणि मानवी चेहऱ्याच्या नव्या जगाच्या निर्मितीसाठी संधी उपलब्ध होत आहेत. पर्यावरणीय, आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रांतील आपली आव्हाने परस्परांत गुंतलेली आहेत. एकत्र येऊन आपल्याला त्यांची सर्वंकष उत्तरे शोधता येतील.

**जागतिक उत्तरदायित्व**

ही आव्हाने पेलण्यासाठी सामुदायिक उत्तरदायित्वाची प्रेरणा प्रबळ करावी लागेल. त्यासाठी विश्वनागरिकांबरोबरच स्थानिक जनसमुदायांशीही एकरूप व्हावे लागेल. जागतिक आणि स्थानिक घटक परस्परावलंबी आणि परस्परपूरक असल्याने आपण वेगवेगळ्या देशांचे नागरिक असतानाच संपूर्ण वैश्विक समाजाचेही घटक झालो आहोत. मानव जात आणि संपूर्ण सजीव सृष्टीच्या वर्तमान आणि भविष्यातल्या कल्याणासाठी प्रत्येक नागरिक बांधील आहे. जेव्हा आपण आपल्या अस्तित्वामागचे गूढ, जीवनाबद्दलची कृतज्ञता आणि मानवाच्या निसर्गातल्या स्थानाबद्दल विनम्र जाणीव बाळगून आपलं जीवन जगायला शिकू तेव्हाच बंधुत्वाची भावना आणि जीवनाबद्दलची आस्था प्रबळ होईल.

उदयोन्मुख नवसमाजाला मूल्यांचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी मूलभूत नीतिमूल्यांच्या संदर्भात आपल्याला एक समान दृष्टिकोन अंगिकारणे आवश्यक आहे. जीवसृष्टीच्या शाश्वततेचे संवर्धन करण्यासाठी सर्व व्यक्ती, संघटना, व्यवसाय, शासनसंस्था आणि बहुराष्ट्रीय कंपन्या यांनी काही समान मानकांच्या चौकटीत आपले व्यवहार केले पाहिजेत. त्यासाठी पुढील परस्परावलंबी तत्त्वांचा आम्ही सामूहिकपणे पुरस्कार करतो.

# तत्त्वे

## I. **सजिवांप्रती आदर आणि जिव्हाळा**

**1. पृथ्वीबद्दल आणि तिच्यावरील वैविध्यपूर्ण जीवसृष्टीबद्दल आदर**

अ. सर्व सजीव परस्परांवर अवलंबून आहेत आणि मानवासाठी कोणाचा किती उपयोग आहे याच्या पलीकडे जाऊन प्रत्येकच सजीव अनमोल आहे ही बाब स्वीकारणे.

आ. प्रत्येक मानवाच्या ठायी वसलेल्या आत्मसन्मानाची कदर करणे आणि मानवजातीच्या बौद्धिक, कलात्मक, नैतिक व आध्यात्मिक क्षमतांवर श्रद्धा ठेवणे.

**2. प्रगल्भता, कणव आणि प्रेमभावनेने जीवसृष्टीची जोपासना करणे**

अ. नैसर्गिक संसाधनांचे स्वामित्व, व्यवस्थापन आणि वापराच्या हक्काच्या हातात हात चालूनच पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्याची आणि लोकांचे हक्क जपण्याची जबाबदारी येते, हे मान्य करणे.

आ. स्वातंत्र्य, ज्ञान आणि सत्तेच्या कक्षा वाढत असताना जनसामान्यांचे हितरक्षण करण्याची जबाबदारीही वाढते हे निर्विवादपणे स्वीकारणे.

**3. न्याय, जनसहभागी, शाश्वत आणि शांतताप्रिय अशा लोकशाहीवादी समाजाची उभारणी करणे.**

अ. विविध स्तरांवरील समाजगटांमध्ये मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याची हमी असेल आणि प्रत्येक व्यक्तीला तिच्या संपूर्ण क्षमतेचा वापर करता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे.

आ. पर्यावरणाचा समतोल ढळू न देता सर्वांची समाजधारक व अर्थपूर्ण उपजीविका होऊ शकेल यासाठी आवश्यक त्या आर्थिकदृष्ट्या न्याय्य व्यवस्थेचा पुरस्कार करणे.

**4. सध्याच्या व आगामी पिढ्यांसाठी पृथ्वीच्या विपुलतेचे आणि सौंदर्याचे रक्षण करणे.**

अ. भावी पिढ्यांच्या गरजांच्या पूर्ततेत आडकाठी येणार नाही याची खबरदारी घेतच प्रत्येक पिढीने स्वत:चे स्वातंत्र्य उपभोगले पाहिजे, हे स्वीकारणे.

आ. पृथ्वीवरील मानवी समूहांच्या व अन्य पर्यावरणीय घटकांचे ज्यामुळे संवर्धन होईल अशा तत्त्वांचे, परंपरांचे आणि संस्थांचे संक्रमण भावी पिढ्यांकडे करणे. वरील चार वचनांच्या पूर्ततेसाठी पुढील गोष्टी आवश्यक आहेत.

**II. पर्यावरणीय एकात्मिकता**

**5. जैववैविध्य आणि जीवसृष्टीची अक्षयता राखणाऱ्या निसर्गप्रक्रिया अंतर्भूत आहेत अशा पृथ्वीवरील सर्व पर्यावरणचक्रांची एकात्मिकता पुनर्स्थापन करणे व अबाधित राखणे.**

अ. पर्यावरण संवर्धन व पुनर्वसन हे सर्व विकासकामांचे अविभाज्य घटक असतील असा दृष्टिकोन ठेवूनच विकास योजना आणि नियमावलींचा सर्व स्तरांवर अंगीकार करणे.

आ. पृथ्वीवरील जीवसृष्टीला पूरक अशा सर्व निसर्गचक्रांच्या व जैवविवधतेच्या संरक्षणासाठी, आणि आपल्या नैसर्गिक वारशाचे जतन करण्यासाठी जंगले आणि सागरी पट्ट्यांचा अंतर्भाव असलेली टिकाऊ स्वरूपातील पर्यावरण क्षेत्रे आरक्षित करून त्यांचे जतन करणे.

इ. विनाशाच्या मार्गावर असलेल्या सजीव जातींच्या आणि निसर्गचक्रांच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न करणे.

ई. एतद्देशीय सजीव जातींना व पर्यावरणाला ज्यामुळे धोका निर्माण होईल असे परप्रदेशी किंवा जनुकीय बदल केलेले जीवाणू काबूत ठेवणे आणि नष्ट करणे. त्याचप्रमाणे असे जीवाणू नव्याने निर्माण करण्यास प्रतिबंध करणे.

उ. पाणी, जमीन, जंगल संपत्ती आणि सागरी संपत्तीच्या पुनर्निर्मितीच्या वेगापेक्षा अधिक वेगाने या पुनर्निमितीक्षम संसाधनांचा वापर होणार नाही अशी पद्धतीने त्यांचे व्यवस्थापन करणे; त्याचप्रमाणे सर्व निसर्गचक्रांची नियमितता अबाधित राखणे.

ऊ. ज्यांचे साठे मर्यादित आहेत अशा खजिन संपत्तीच्या व इंधनस्रोतांच्या उपशावर आणि वापरावर नियंत्रण राखणे, कारण तसे केले तरच त्यांची घट कमी होईल आणि निसर्गाची मोठी हानी होणार नाही.

**6. पर्यावरणाचे नुकसान टाळणे हाच पर्यावरणरक्षणाचा सर्वोत्तम उपाय असल्याने तशी पावले उचलणे, आणि जेव्हा हाताशी अपुरी माहिती/ज्ञान असेल तेव्हा सावध पवित्रा घेणे.**

अ. शास्त्रीय ज्ञान अपुरे असेल आणि शास्त्रीय निष्कर्ष संदिग्घ असतील तेव्हा पर्यावरणाचे मोठे किंवा अपरिवर्तनीय नुकसान होणार नाही यासाठी नव्याने पावले उचलणे.

आ. एखाद्या कृतीमुळे मोठे नुकसान होणार नाही असा दावा कोणी करीत असेल तर तसे सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांच्यावरच टाकणे, आणि पर्यावरणाची हानी झालीच तर त्यासाठीही संबंधितांनाच जबाबदार धरणे.

इ. मानवी कृतींच्या एकत्रित, दीर्घकालीन, अप्रत्यक्ष, दूरगामी व जागतिक परिणामांची दखल घेऊनच निर्णय घेतले जातील अशी व्यवस्था निर्माण करणे.

ई. पर्यावरणाच्या प्रत्येक घटकाचे प्रदूषण रोखणे आणि किरणोत्सर्ग करणाऱ्या किंवा जैविकदृष्ट्या हानीकारक अशा कोणत्याही पदार्थांची निर्मिती व साठ्यांना प्रतिबंध करणे.

उ. पर्यावरणाला घातक अशा लष्करी कृती/कारवाया टाळणे.

**7. ज्यामुळे पृथ्वीवरील पुनर्निर्मितीच्या क्षमता वाढतील, मानवी हक्कांचे संरक्षण होईल आणि जनसमूहांचे हित राखले जाईल अशा प्रकारच्याच निर्मिती, वापर व पुनर्निर्मितीच्या प्रक्रियांचा अंगीकार करणे.**

अ. उत्पादनाच्या व उपभोगाच्या वस्तूंचा वापर कमी करणे, त्यांचा पुनर्वापर करणे आणि त्यांची पुनर्निर्मिती करणे; त्याचप्रमाणे या प्रक्रियेत निर्माण होणारे 'शेष' पदार्थ पर्यावरणात मिसळून जातील अशी व्यवस्था करणे.

आ. ऊर्जेचा वापर संयमाने व काटकसरीने करणे, त्याचप्रमाणे सौर किंवा पवनऊर्जेवर पुनर्निर्मितीक्षम ऊर्जास्रोत अधिकाधिक प्रमाणात उपयोगात आणणे.

इ. पर्यावरणाला पूरक अशा तंत्रज्ञानाच्या विकासाचा, अंगिकाराचा व न्याय हस्तांतराचा पुरस्कार करणे.

ई. सर्व वस्तूंच्या व सेवांच्या विक्रीमूल्यांमध्ये त्यांच्या सगळ्या पर्यावरणीय आणि सामाजिक खर्चाचा अंतर्भाव करणे, त्यायोगे सामाजिक व पर्यावरणीय उद्दिष्टांशी कोणत्या वस्तू सर्वाधिक पूरक आहेत ते समजून घेण्यास ग्राहकांना मदत करणे.

उ. सुरळीत आणि विचारपूर्वक पुनरुत्पादनासाठी आवश्यक ती सुदृढता निर्माण व्हावी यासाठीची सार्वत्रिक आरोग्य सेवा व्यवस्था अमलात आणणे.

ऊ. मर्यादित संसाधने असलेल्या या जगात विविध गोष्टींचा संयमित वापर करायला शिकविणाऱ्या जीवनशैलीचा अंगीकार करणे.

**8. पर्यावरणाची शाश्वतता वाढावी यासाठीच्या अभ्यास/संशोधनास पाठबळ देणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या माहिती/ज्ञानाचे खुले व व्यापक आदानप्रदान करणे.**

अ. विकसनशील देशांच्या गरजांकडे विशेष लक्ष देत, शाश्वत विकासासाठीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील शास्त्रीय आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामधील सहकार्याचा पुरस्कार करणे.

आ. पर्यावरण रक्षण आणि मानवहिताचा पुरस्कार करणाऱ्या विविध संस्कृतींमधील पारंपरिक ज्ञानाची व आध्यात्मिक प्रगल्भतेची दखल घेणे, त्याचे जतन करणे.

इ. मानवी आरोग्य आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आत्यंतिक महत्त्वाची असलेली माहिती (जनुकीय माहितीसह) सर्व जनतेला कायम उपलब्ध राहील, अशी व्यवस्था करणे.

## III. सामाजिक आणि आर्थिक न्याय

**9. नैतिक, सामाजिक व पर्यावरणीय पूर्वअट म्हणून गरिबीचे उच्चाटन करणे.**

अ. पिण्यायोग्य पाणी, स्वच्छ हवा, अन्नसुरक्षा, शुद्ध माती, निवारा आणि सुरक्षित सांडपाणी निचरा व्यवस्थेची हमी देणे. यासाठी आवश्यक त्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संसाधनांची तरतूद करणे.

आ. शाश्वत उपजीविकेसाठी प्रत्येक व्यक्तीला शिक्षण व संसाधने पुरवून सक्षम करणे, आणि जे स्वावलंबी होऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी सामाजिक सुरक्षेची व्यवस्था करणे.

इ. दुर्लक्षित लोकांची दखल घेणे, कमकुवत लोकांचे रक्षण करणे, पीडितांना मदत करणे, आणि या सर्वांना त्यांची स्वप्नपूर्ती करता यावी या दृष्टीने त्यांना सक्षम करणे.

**10. मानवविकास न्याय व शाश्वत पद्धतीनेच घडवून आणणारे आर्थिक व्यवहार आणि अर्थसंस्था विविध स्तरांवर असतील, अशी व्यवस्था करणे.**

अ. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संपत्तीचे न्याय्य वाटप करण्याचा पुरस्कार करणे.

आ. विकसनशील देशांच्या बौद्धिक, आर्थिक, तंत्रज्ञानविषयक आणि सामाजिक संसाधनांचा विकास करणे, आणि महाकाय आंतरराष्ट्रीय कर्जातून त्यांची मुक्तता करणे.

इ. सर्व व्यापारी व्यवहार संसाधनांच्या शाश्वत वापर करून, पर्यावरणाची काळजी घेत आणि कामगारवर्गाबाबतच्या मापदंडांनुसार होतील, अशी व्यवस्था करणे.

ई. जनहित केंद्रस्थानी ठेवूनच सर्व बहुराष्ट्रीय कंपन्या व आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांनी त्यांचे काम पारदर्शक पद्धतीने करावे अशी अपेक्षा राहील, आणि त्यांच्या सर्व कृत्यांच्या परिणामांचे उत्तरदायित्व त्यांच्यापाशीच राहील.

**11. शाश्वत विकासासाठी लैंगिक समानता व समता अत्यावश्यक आहेत हे अधोरेखित करणे; आणि सर्वांना शिक्षण, आरोग्यसेवा व आर्थिक प्रगतीच्या संधी उपलब्ध होतील, अशी व्यवस्था करणे.**

अ. महिला व मुलींच्या मानवी हक्कांचे रक्षण करणे आणि त्यांच्याविरुद्धच्या सर्व प्रकारच्या हिंसाचाराला आळा घालणे.

आ. सर्व प्रकारच्या आर्थिक, राजकीय, नागरी, सामाजिक व सांस्कृतिक प्रक्रियांमध्ये महिलांचा सहभाग वाढवून त्या त्या प्रक्रियांमध्ये बरोबरीच्या भागीदार, निर्णयकर्त्या, नेत्या आणि लाभार्थी बनतील असे पाहणे.

इ. कुटुंबव्यवस्था भक्कम करीत कुटुंबातील सर्व सदस्यांच्या सुरक्षिततेची व प्रेमपूर्वक जोपासनांची काळजी घेणे.

**12. मानवी प्रतिष्ठा, शारीरिक स्वास्थ्य आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी अनुकूल अशा नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणाचा हक्क कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वांना मिळावा, आणि हे करताना स्थानिक लोक व अल्पसंख्याकांवर विशेष भर द्यावा.**

अ. वंश, त्वचेचा रंग, लिंग, लैंगिक धारणा, धर्म, भाषा, राष्ट्रीयत्व आणि सांस्कृतिक किंवा सामाजिक पार्श्वभूमी यांसारख्या घटकांशी संबंधित सर्व प्रकारच्या भेदभावांचे उच्चाटन करणे.

आ. मूळच्या स्थानिक लोकांच्या आध्यात्मिक धारणा, ज्ञान, जमीनजुमला, संसाधने आणि शाश्वत उपजीविकेसाठी त्यांनी अंगिकारलेली जीवनशैली अबाधित राखण्याचा त्यांचा अधिकार मान्य करणे.

इ. शाश्वत समाजरचनांच्या निर्मितीमध्ये आपल्या समाजातील तरुणांची असलेली कळीची भूमिका लक्षात घेऊन त्यांना त्यासाठी प्रोत्साहन देणे.

ई. सांस्कृतिक व आध्यात्मिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या स्थलांची देखभाल व संरक्षण करणे.

## IV. लोकशाही, अहिंसा आणि शांतता

**13. सर्व स्तरांवर लोकशाही संस्थांचे सबलीकरण करणे. प्रशासन अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी बनवणे, निर्णयप्रक्रियेतील सर्वंकष सहभागाला चालना देऊन न्याय मिळवण्यासाठीची साधने सहज उपलब्ध करून देणे.**

अ. पर्यावरण आणि विकासाच्या अशा सर्व योजना व कार्यक्रम, ज्यांचा स्थानिक लोकांवर परिणाम होऊ शकतो किंवा ज्यामध्ये या लोकांना रस असू शकतो, त्यासंबंधीची स्पष्ट आणि समयोचित माहिती घेण्याचा त्यांचा अधिकार मान्य करणे.

आ. स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक नागरी समाजाला आधार देणे आणि त्यात रस असलेल्या सर्व व्यक्ती व संस्थांना त्यासंबंधीच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे.

इ. स्वतंत्र मतप्रदर्शन करण्याच्या, अभिव्यक्तीच्या, शांततामय मार्गाने एकत्र येण्याच्या, संघटन करण्याच्या आणि मतभिन्नता व्यक्त करण्याच्या अधिकारांचे रक्षण करणे.

ई. पर्यावरणीय हानीच्या समस्यांची ओळख करून घेण्याच्या व त्यावरील उपायांच्या अंमलबजावणीसाठी प्रभावी व कार्यक्षम प्रशासकीय आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था उपलब्ध करून देणे.

उ. सर्व सार्वजनिक व खासगी संस्थांतून भ्रष्टाचाराचे निर्मूलन करणे.

ऊ. आपल्या भोवतालच्या पर्यावरणाची देखभाल करण्यासाठी स्थानिक समुदायांचे सबलीकरण करणे. जेथे शासनाची प्रभावी भूमिका शक्य आहे तेथे पर्यावरणाशी संबंधित जबाबदाऱ्या शासनाकडे सोपवणे.

**14. शाश्वत जीवनशैलीसाठी आवश्यक असलेले ज्ञान, नीतिमूल्ये आणि कौशल्ये यांचा औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणामध्ये अंतर्भाव करणे.**

अ. शाश्वत विकासातील जबाबदारी पार पाडण्यास मुले आणि तरुणांसह सर्वांना सक्षम बनवण्यासाठी त्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे.

आ. शाश्वतताविषयक ज्ञानप्रसारासाठी कला, मानव्यविद्या आणि विज्ञानाच्या योगदानाला प्रोत्साहन देणे.

इ. पर्यावरण आणि सामाजिक आव्हानांच्या संदर्भात जागृती निर्माण करण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका आणखी सकस बनवणे.

ई. शाश्वत जीवनशैलीसाठी आवश्यक त्या नैतिक आणि आध्यात्मिक शिक्षणाला मान्यता देणे.

**15. सर्व सजिवांना आदराची आणि सौहार्दाची वागणूक देणे**

अ. मानवी समाजात व सान्निध्यात राहणाऱ्या प्राण्यांसंबंधातील क्रौर्य रोखणे आणि त्यांना होणारा जाच रोखणे.

आ. वन्यजीवांवर गंभीर आणि दीर्घकाळ परिणाम करणाऱ्या व रोखता येण्याजोग्या शिकार, सापळे आणि मासेमारीसारख्या गोष्टींपासून त्यांचे संरक्षण करणे.

इ. लक्ष्य नसलेल्या प्राणीजातींचा विनाश टाळणे आणि शक्य तितक्या प्रमाणात त्यांचे संरक्षण करणे.

**16. सहिष्णूता, अहिंसा आणि शांततेची संस्कृती रुजवणे**

अ. सर्व मानवी समूहांत, विविध राष्ट्रांमध्ये आणि राष्ट्रांदरम्यान परस्पर सामंजस्य, बंधुभाव व सहकार्य वाढीला लावण्यासाठी उत्तेजन देणे.

आ. पर्यावरणविषयक आणि अन्य वाद सोडवताना हिंसात्मक संघर्ष रोखण्यासाठी समायोचित रणनीती अवलंबणे आणि परस्पर सहकार्यातून समस्या सोडवण्यावर भर देणे.

इ. आक्रमण वा युद्धासाठी लष्कराचा वापर न करता तो केवळ संरक्षणापुरताच मर्यादित ठेवणे. सैन्यशक्तीचा वापर पर्यावरण पुनरुज्जीवनासारख्या शांततामय कामासाठी करून घेणे.

ई. आण्विक, जैविक आणि विषारी शस्त्रांसह अन्य विनाशकारी शस्त्रास्त्रे नष्ट करणे.

उ. पृथ्वीच्या कक्षेतील आणि कक्षेबाहेरील गोष्टींचा पर्यावरण रक्षण व शांततेसाठी उपयोग होईल याची खात्री करणे.

ऊ. स्वतःशी, इतरांशी, अन्य संस्कृतींशी, अन्य सजिवांशी, पृथ्वीशी आणि आपण ज्याचे एक घटक आहोत अशा विश्वाशी राखलेल्या योग्य प्रकारच्या नात्यांतून निर्माण होणारी एकात्मता म्हणजे शांतता आहे, याची जाणीव राखणे.

# आगामी वाटचाल

इतिहासात यापूर्वी कधीही आली नव्हती अशी एक नवी सुरुवात करण्याची साद आपले सामुदायिक भवितव्य आपल्याला घालत आहे. वसुंधरा जाहीरनाम्यातील या तत्त्वांमुळे अशा पुनर्निर्माणाची हमी

दृष्टिपथात येत आहे. ही हमी प्रत्यक्षात येण्यासाठी, या जाहीरनाम्यातील मूल्यांचा आणि उद्दिष्टांचा अंगीकार करून त्यांची पाठराखण केली पाहिजे.
यासाठी बुद्धी आणि भावनांच्या परिवर्तनाची गरज आहे. विश्वव्यापी परस्परावलंबनाच्या आणि सर्वंकष जबाबदारीच्या नव्या जाणिवेचीही यासाठी आवश्यकता आहे. स्थानिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर शाश्वत जीवनशैलीसाठीची दृष्टी कल्पकतेने विकसित करून तिचा अंगीकार करायला हवा. आपली सांस्कृतिक विविधता हा एक मौल्यवान ठेवा आहे. नव्या जीवनदृष्टीला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी हे विविध सांस्कृतिक प्रवाह आपापले स्वतंत्र मार्ग शोधतील. ज्या सुसंवादातून वसुंधरेचा जाहीरनामा निर्माण झाला आहे, त्या जागतिक संवादाला आपण आणखी सखोल आणि व्यापक स्वरूप दिले पाहिजे. कारण सत्य आणि ज्ञान यांच्या या एकत्रित शोधयात्रेतून आपल्याला आणखी बरेच काही शिकायचे आहे.

जीवनातील महत्त्वाच्या नीतिमूल्यांमध्ये तणाव असतातच. यामुळे निवड करणे कठीण बनू शकते. तथापि, विविधतेची एकात्मतेशी, स्वातंत्र्याच्या अभिव्यक्तीची सामान्यांच्या हिताशी, आणि दूरगामी ध्येयांची अल्पकालीन उद्दिष्टांशी नाळ जोडण्याचे मार्ग आपण शोधायला हवेत. प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, संस्था आणि समुदाय यांची भूमिका यात महत्त्वाची आहे. कला, विज्ञान, धर्म, शैक्षणिक संस्था, प्रसारमाध्यमे, व्यवसाय-उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि शासन या सर्वच क्षेत्रांतून कल्पक नेतृत्व पुढे येण्याची आवश्यकता आहे. शासन, नागरी समाज आणि उद्योग यांचा परस्पर सहयोग प्रभावी अंमलबजावणीसाठी अत्यावश्यक आहे.

शाश्वत जागतिक समुदायाच्या उभारणीसाठी सर्व देशांनी संयुक्त राष्ट्रांना दिलेल्या अभिवचनांबद्दलची आपली बांधिलकी अधिक जोमाने व्यक्त केली पाहिजे, आणि सध्या अस्तित्वात असलेल्या आंतरराष्ट्रीय करारांच्या संदर्भातील आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण केल्या पाहिजेत, तसेच वसुंधरा जाहीरनाम्यातील तत्त्वांच्या अंमलबजावणीला पाठिंबा दिला पाहिजे. पर्यावरण आणि विकासाच्या संदर्भातील या वसुंधरा जाहीरनाम्यामधील तत्त्वांना एक कायदेशीर अधिष्ठान प्राप्त करून दिले पाहिजे.

एका आदरयुक्त जीवनदृष्टीच्या निर्मितीचा, शाश्वततेचे मूल्य रुजविण्याच्या दृढ निर्धाराचा, न्याय आणि शांतता प्राप्तीसाठीच्या लढ्याला गती देण्याचा आणि आनंददायी जीवनोत्सवाचा हा आपला काळ आहे अशी नोंद इतिहासात होऊ दे.

---

**वसुंधरा जाहीरनाम्याचा निर्मिती**
वसुंधरा जाहीरनाम्याची निर्मिती वसुंधरा जाहीरनामा समितीने स्वतंत्रपणे केली आहे. 1992 मध्ये झालेल्या वसुंधरा परिषदेनंतर आंतरराष्ट्रीय सहमतीद्वारे शाश्वत भविष्यासाठी मूल्ये आणि तत्त्वे निश्चित करण्यासाठी हा जाहीरनामा तयार करण्यात आला. सुमारे दहा वर्षे चाललेल्या आंतरराष्ट्रीय चर्चांच्या आधारावर हा जाहीरनामा तयार करण्यात आला. या चर्चेत पाच हजारांहून अधिक व्यक्तींनी सहभाग घेतला होता. या जाहीरनाम्याला युनेस्को, आय.यू.सी.एन. (जागतिक संवर्धन संघ) यांच्यासह हजारो संस्थांनी मान्यता दिली आहे.

अधिक माहितीसाठी www.EarthCharter.org इथे भेट द्या.

-------समाप्त-------